
ऑनलाइन गृहपाठापासून हजारो विद्यार्थी वंचित

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : शाळा बंद असताना विद्यार्थ्यांपर्यंत अभ्यास साहित्य, उपक्रम पोहोचवून त्यांना शिक्षण प्रवाहात कायम ठेवण्याचे सार्वत्रिक प्रयत्न राज्यात अद्यापही काहीसे तोकडे पडत असल्याचे दिसत आहे. 'असर'च्या अहवालानुसार राज्यातील ६३.८ टक्केच विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्य किंवा गृहपाठ मिळत असल्याचे दिसते आहे. साहित्य न मिळणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ५८ टक्के विद्यार्थ्यांना शाळा साहित्य देत नसल्याची माहिती पालकांनी दिली आहे.

विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शैक्षणिक साहित्याची उपलब्धता, सुविधा यांचे चित्र प्रथम फाऊंडेशन 'असर'च्या माध्यमातून दरवर्षी मांडते. यंदा शिक्षण



आणि शैक्षणिक वर्षाचे स्वरूप करोनाच्या प्रादुर्भावामुळे बदलले आहे. त्या पार्श्वभूमीवर शिक्षण प्रवाहातील विद्यार्थ्यांची पाहणी यंदा करण्यात आली. विद्यार्थ्यांकडील साधनांची उपलब्धता, पालकांचा सहभाग अशा मुद्द्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. राज्यातील ९८१ गावांतील ३ हजार ४०९ घरांतील ७ हजार ५०० विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी साधारण ३६ टक्के विद्यार्थ्यांपर्यंत अभ्यास साहित्य किंवा उपक्रम पोहोचत नसल्याचे दिसत आहे. साहित्य पोहचू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ५८ टक्के विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळा साहित्य देत नसल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना गृहपाठ किंवा अभ्यास साहित्य हे बहुतांशी म्हणजे साधारण ९१ टक्के विद्यार्थ्यांना व्हॉट्स ॲपच्या माध्यमातून पाठवण्यात येते. ज्या विद्यार्थ्यांपर्यंत साहित्य न पोहोचवण्याचे कारण साधनांच्या उपलब्धतेचा अभाव हे देखील आहे. ३२.७ टक्के विद्यार्थ्यांकडे स्मार्ट फोन नाही, ८.८ टक्के विद्यार्थ्यांकडे इंटरनेट नाही, ३.६ टक्के विद्यार्थ्यांच्या घरी नेटवर्क मिळत नसल्याचे समोर आले. साधारण ७० टक्के विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा स्रोत पाठ्यपुस्तक आहे.

'असर'च्या पाहणीतील निरीक्षण

शासकीय शाळांवर विश्वास वाढला

- गेल्या काही वर्षांपासून शासकीय शाळांतून खासगी शाळांकडे वाहणारा विद्यार्थी ओघ आता बदलताना दिसतो आहे.
- शासकीय शाळांतील प्रवेशाचे प्रमाण २०१८ च्या तुलनेत वाढल्याचे आणि खासगी शाळांतील घटल्याचे असरच्या पाहणीतून समोर आले आहे.
- शासकीय शाळांत प्रवेश घेतलेल्या पहिली ते दहावीतील मुलांचे प्रमाण ६३.८ टक्के आहे, ते २०१८ मध्ये ५३.२ टक्के होते.
- मुलींचे प्रमाण ६५ टक्के आहे ते २०१८ मध्ये ५३.७ टक्के होते.
- खासगी शाळांतील मुलांचे प्रमाण ४६.८ टक्क्यांवरून ३६.२ टक्के झाले आहे, तर मुलींचे प्रमाण ४२.७ टक्क्यांवरून ३५ टक्के झाले आहे.
- सध्या शाळा बंद असताना विद्यार्थी आणि पालकांशी संवाद ठेवणे, साहित्य पोहोचवणे, शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे यात शासकीय शाळा आघाडीवर आहेत.

पालकांच्या सहभागात वाढ

मुलांची अध्यापन प्रक्रिया, साधनांची उपलब्धता, शाळेला येणाऱ्या अडचणी सोडवण्यात पालकांचा सहभाग वाढल्याची नोंद अहवालात करण्यात आली आहे. पालकांची शैक्षणिक पात्रता कमी असली तरी मुलांच्या शिक्षणाबाबत जागरुकता आणि सहभाग वाढला आहे. ८४.७ टक्के विद्यार्थी अभ्यासात पालकांची मदत घेत आहेत.



अभिनेत्रीवर हल्ला करणाऱ्याचा शोध

मुंबई : अभिनेत्री मालवी मल्होत्रावर हल्ला करणारा तरुण सापडला असून योगेश महिपाल सिंग असे या तरुणाचे नाव आहे. तो वसईतील खासगी रुग्णालयात उपचार घेत आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. उपचारांसाठी रुग्णालयात दाखल झाल्याने पोलिसांनी बुधवारी रात्रीपर्यंत त्याला अटक केली नव्हती.

योगेश याने मालवीला लग्नाची मागणी घातली. मालवी यांनी त्याला नकार दिला होता. सोमवारी रात्रीच्या सुमारास वर्सोवा येथील हॉटेलमधून घरी निघालेल्या मालवीला रस्त्यात अडवून त्याने पुन्हा लग्नाची मागणी घातली. मालवीने नकार देताच नाराज झालेल्या योगेशने तिच्यावर चाकूने तीन वार केले. त्यात मालवी जखमी झाली. याप्रकरणी योगेश विरोधात वर्सोवा पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

सुशांतच्या बहिणींवरील गुन्हा गृहितकांच्या आधारे

उच्च न्यायालयात सीबीआयची भूमिका

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : अभिनेता सुशांतसिंह राजपूतच्या बहिणींवर अभिनेत्री रिया चक्रवर्ती हिने केलेले आरोप मुख्यत्वे अनुमानावर आधारित आहेत. अनुमानांच्या आधारे गुन्हा दाखल केला जाऊ शकत नाही आणि एकाच घटनेसाठी दोन गुन्हे दाखल होऊ शकत नाहीत. त्यामुळे मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल करायला नको होता, असा दावा केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) प्रतिज्ञापत्राद्वारे बुधवारी उच्च न्यायालयात केला.

सुशांतला डॉक्टरांच्या बनावट चिठ्ठीच्या आधारे औषधे दिल्याच्या आरोपप्रकरणी त्याच्या बहिणी प्रियांका आणि मीतू सिंह यांच्याविरोधात रियाने वांद्रे पोलिसांत तक्रार नोंदवली होती. त्यानंतर पोलिसांनी दोघींसह दिल्लीस्थित डॉक्टरवर गुन्हा दाखल केला होता. प्रियांका आणि मीतू यांनी गुन्हा रद्द करण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यांच्या याचिकेवर भूमिका स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र सीबीआयने बुधवारी उच्च न्यायालयात सादर केले.

मुंबई पोलिसांनी प्रियांका आणि मीतूवर अनुमानाच्या आधारे दाखल केला आहे. पोलिसांनी रियाच्या तक्रारीवर थेट गुन्हा दाखल करण्यापूर्वी प्राथमिक चौकशी करायला हवी होती, असा दावा सीबीआयने प्रतिज्ञापत्राद्वारे केला आहे. सुशांतच्या वडिलांनी त्याच्या मृत्यूप्रकरणी रिया आणि तिच्या कुटुंबीयांविरोधात केलेल्या तक्रारीचा किंबहुना त्याच्या मृत्यूशी संबंधित सगळ्या शक्यतांचा तपास आम्ही करत आहोत. त्यामुळे मुंबई पोलिसांनी रियाच्या तक्रारीवर गुन्हा दाखल करण्याऐवजी ती आमच्याकडे वर्ग करायला हवी होती, याकडे सीबीआयने न्यायालयाचे लक्ष वेधले.

एकाच घटनेसाठी दुसऱ्यांदा गुन्हा नोंदवणे हे कायद्याने मान्य नाही आणि तसे करणे चुकीचे असल्याचे सीबीआयने म्हटले. सुशांतला बनावट औषधांची चिठ्ठी पाठवल्याची बाब रियाला माहीत होती तर तिने सप्टेंबरपर्यंत त्याबाबत मौन का बाळगले, असा प्रश्नही सीबीआयने उपस्थित केला आहे.

मुंबईत आतापर्यंत ८८ टक्के रुग्ण करोनामुक्त

दिवसभरात १,३५४ रुग्ण, ३१ जणांचा मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबईत करोना पुन्हा एकदा नियंत्रणात येत असल्याचे चित्र आहे. आतापर्यंत मुंबईत एकूण १४ लाख ६८ हजारांहून अधिक चाचण्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी २,५२,८८८ रुग्ण बाधित आढळले आहेत. म्हणजेच मुंबईतील बाधित रुग्ण आढळण्याचे प्रमाण १७.१७ टक्के इतके आहे.

दरम्यान, बुधवारी १,३५४ नव्या रुग्णांची नोंद झाली असून ३१ रुग्णांचा मृत्यू झाला आहे, तर १७१६ रुग्ण बरे होऊन घरी गेले. मुंबईत आतापर्यंत ८८ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहेत. मुंबईतील रुग्ण दुपटीचा कालावधी १४४ दिवसांवर गेला आहे.

पोलीस उपनिरीक्षकाचा मृत्यू

कांदिवली पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक महेश कडणे (४४) यांचा बुधवारी करोनाने मृत्यू झाला. अंधेरीतील सेव्हन हिल्स रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. कडणे यांना करोनाची लागण झाल्याचे २० ऑक्टोबरला निष्पन्न झाले होते. त्यानंतर पुढील उपचारांसाठी त्यांना अंधेरीतील सेव्हन हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मागील तीन दिवसांपासून त्यांची प्रकृती गंभीर होती. त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. उपचारांदरम्यान बुधवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला. ते बोरीवली पोलीस वसाहतीत वास्तव्यास होते. मंगळवारपर्यंत राज्यभरात पोलीस दलातील २६२५४ पोलिसांना करोनाची बाधा झाली आहे. यात पोलीस दलातील २८७० अधिकाऱ्यांना, तर २३३८४ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. सध्या १५८९ पोलीस करोनाबाधीत असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे. तर २७ अधिकाऱ्यांचा व २५५ कर्मचाऱ्यांचा करोनाने मृत्यू झाला आहे.


राज्यात ९१ रुग्णांचा मृत्यू

मुंबई : राज्यात बुधवारी ६ हजार ७३८ नव्या करोना रुग्णांची नोंद झाली. दिवसभरात ८ हजार ४३० रुग्णांनी या आजारावर मात केली असून ९१ रुग्णांचा मृत्यू झाला. राज्यात आजपर्यंत १४ लाख ८६ हजार ९२६ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी परतल्याने राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ८९.५३ टक्क्यांवर पोहोचले आहे. सध्या राज्यभरात २५लाख २८ हजार ५४४ व्यक्ती गृहविलगीकरणात तर १२ हजार ९८८ व्यक्ती संस्थात्मक विलगीकरणात आहेत.

ठाणे जिल्ह्यात ८५३ नवे रुग्ण

ठाणे : जिल्ह्यात बुधवारी ८५३ करोना रुग्ण आढळून आले. त्यामुळे एकूण बाधितांची संख्या २ लाख ९ हजार १३८ वर पोहोचली आहे. दिवसभरात १५ रुग्णांचा मृत्यू झाला असून, करोनाबळींची संख्या ५ हजार २७६ इतकी झाली आहे.

बुधवारी आढळलेल्या रुग्णांमध्ये ठाणे शहरातील २१९, कल्याण-डोंबिवलीतील १९७, नवी मुंबईतील १८१, ठाणे ग्रामीणमधील ७३, मीरा-भाईंदरमधील ६६, बदलापूर शहरातील ४८, अंबरनाथमधील ३३, उल्हासनगर शहरातील २३ आणि भिवंडी शहरातील १३ रुग्णांचा समावेश आहे. तर मृतांमध्ये ठाणे



शहरातील चार, मीरा-भाईंदरमधील चार, नवी मुंबईतील तीन, ठाणे ग्रामीणमधील दोन, तर कल्याण-डोंबिवली आणि भिवंडीतील प्रत्येकी एका रुग्णाचा समावेश आहे.



IDEMI
INSTITUTE FOR DESIGN OF ELECTRICAL MEASURING INSTRUMENTS
(MINISTRY OF MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES, GOVERNMENT OF INDIA)
MSME TECHNOLOGY CENTRE - MUMBAI
(A Govt. of India Society)

— RECRUITMENT (Ad-Hoc) —

NAME OF POST - Senior Engineer - Electronics (Research and Development)
QUALIFICATION - B.E. Electronics or EXTC
EXPERIENCE - 2 to 3 years experience in ESDM Sector, Electronics Products Design & Development, software and hardware knowledge for Designing and programming related to embedded system.
AGE LIMIT - 35 Years

NAME OF POST - 3D Animation & VFX Faculty (Training)
QUALIFICATION - Diploma or Degree in any branch or equivalent from a recognized University/Institutions and Specialization course in relative field.
EXPERIENCE - 2 to 5 years Expert Level Practical Knowledge of 3D Animation & VFX in Autodesk Maya 3DS max, with astrong background in 3D modeling, Lighting, Texturing, Rigging, Compositing Editing.
Knowledge of Photoshop, Illustrator, After Effects, Premiere Pro and 3D Software.
AGE LIMIT - 35 Years

NAME OF POST - Web Designer & Developer (Training)
QUALIFICATION - Diploma or Degree in any branch or equivalent from a recognized University/Institutions and Specialization course in relative field.
EXPERIENCE - 2 to 5 years, experience in front-end and back-end development, web programming languages such as HTML and CSS, JQuery, JavaScript, strong knowledge of Bootstrap, Web Designing, Photoshop, Illustrator will be added advantages.
AGE LIMIT - 35 Years

Application format is available on IDEMI Website (www.idemi.org). Kindly download it and submit as per prescribed format.
Attested photocopies of relevant certificates in respect of qualification, date of birth, etc. should be enclosed with the application and must reach on or before 9th November 2020 to the Principal Director I/C, Institute for Design of Electrical Measuring Instruments (IDEMI), Eastern express highway, Chunabhatti, Sion P.O., Mumbai – 400 022 only by post/Courier.

एडिलवीस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कं. लि.
सीआयएन: यू६७१००एमएच२००७पीएलसी१७४७५९
नोंदणीकृत कार्यालय : एडिलवीस हाऊस, ऑफ सीएसटी रोड, कालिना, मुंबई-४०००९८

जोडपत्र-IV-ए [पाहा नियम ९ (१) सोबत वाचला जाणारा ८ (६)]

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६)च्या तरतुदीसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना सामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार (रां) आणि हमीदार (रां) आणि सामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, खाली नमूद करण्यात आलेल्या स्थावर मालमत्ता सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण ठेवण्यात आल्या आहेत ज्याचा प्रत्यक्ष ताबा इंडिअन बँकेच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे. मे. ऋषभ कन्वेअर्टस प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार) आणि हमीदार यांच्याद्वारे देय असलेल्या त्यांच्या कर्जाची देणी आणि खाली नमूद करण्यात आलेल्या सर्व हमींवरील त्यांचे सर्व अधिकार, नामनिर्देश आणि स्वारस्य एडिलवीस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (ईएआरसी- ट्रस्ट एससी-३४ चे विश्वस्त म्हणून कार्यरत असलेले) ('ईएआरसी') यांच्याकडे नियुक्ती करार दिनांकित २८.३.२०१४ अनुसार हस्तांतरित करण्यात आले आहे. ईएआरसी हे सुरक्षित धनको म्हणून मे. ऋषभ कन्वेअर्टस प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार) आणि मनोज बी. शाह, धुमील कुमार विनोद शेठ ('हमीदार') यांच्याकडून ईएआरसी, सुरक्षित धनको यांना कर्ज वसुली न्यायाधिकरण- II, मुंबई न्यायपीठ यांच्याद्वारे जारी करण्यात आलेल्या ओए क्र ११४/२०२० मधील वसुली प्रमाणपत्र क्र. ३५/ २०१३ मध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम रु. ३१,७९,४५,०७३/- (रुपये एकतीस कोटी एकूणऐंशी लाख पंचेचाळीस हजार त्र्याहत्तर मात्र) अधिक त्यावरील व्याजाच्या वसुलीसाठी 'जे आहे जेथे आहे', 'जे आहे जसे आहे' आणि 'जसे आहे तसे आहे' तत्त्वावर नोव्हेंबर १८, २०२० रोजी विक्री करण्यात येणार आहे.

प्रत्येक मालमत्तेसाठीचे राखीव मूल्य आणि इसारा रक्कम ठेव खाली दिल्यानुसार आहे.

लॉट क्र.	राखीव मूल्य	इसारा रक्कम ठेव
लॉट-I	रु. ४५,००,०००	रु. ४,५०,०००
लॉट-I	रु. ६९,००,०००	रु. ६,९०,०००

स्थावर मालमत्तेचे वर्णन

लॉट क्र.	सुरक्षित संपत्तीचा तपशील
लॉट-I	३७, आटगाव, इंडस्ट्रिअल इस्टेट, शहापूर, ठाणे, महाराष्ट्र येथील नवीन सर्व्हे क्र. ५८/४, ५७/१, ५७/२, ५७/३, ५६/१ येथील प्लॉट क्र. ३७ सर्व्हे क्र. २१९/४, २२०/१, २२०/२, २२०/३, २२१/१ म्हणून माहिती असलेल्या जो मे. ऋषभ कन्वेअर्टस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या नावे असलेला १३०० चौ. मी. मोजमापाचा जमिनीच्या खंड आणि भूखंड आणि त्यावर उभ्या असलेल्या सर्व इमारती आणि बांधकामाच्यासह.
लॉट-II	सर्व्हे क्र. ८०/१३ (भाग) आणि ८०/१३/३ येथील अमन इंडस्ट्रिअल इस्टेट, गाव पुंढे, शहापूर, ठाणे, महाराष्ट्र येथील धारण केलेले असे इंडस्ट्रिअल गाळा क्र. गाळा क्र. ए १, ए २ आणि ए ६ चा खंड आणि भूखंड ५०३१ चौ. फू. मोजमाप (गाळा क्र. ए १ आणि ए २ साठी) आणि २५०२ चौ. फू. (गाळा क्र. ए ६) असलेले जे मे. ऋषभ कन्वेअर्टस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या नावे असलेले.

लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया सुरक्षित धनको यांच्या संकेतस्थळ म्हणजेच **www.edelweissarc.in/Propertysale** वरील लिंकचा संदर्भ घेण्यात यावा.

सही/-
दिनांक : २९.१०.२०२०
ठिकाण : मुंबई
प्राधिकृत अधिकारी
दूरध्वनी क्र. ७५०६६४२५३४/९१३६९७८२३०

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ईमेल: ig-mcxccl@mcxccl.com | वेबसाइट: www.mcxccl.com

३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही व सहामाहीकरीता अलेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर २०२० अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० जून २०१९ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर २०१९ अलेखापरीक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर २०२० अलेखापरीक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर २०१९ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२० लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	२,६१९.७१	१,७३७.२१	१,९६०.७२	४,३५६.९२	३,५११.४०	७,१५३.१३
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	१,४१४.२२	६२६.५०	७८२.३९	२,०४०.७२	१,२७२.१७	२,६७१.५५
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	१,४१४.२२	६२६.५०	७८२.३९	२,०४०.७२	१,२७२.१७	२,६७१.५५
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	१,४१४.२२	६२६.५०	९२८.७३	२,०४०.७२	१,२६९.३६	२,७९२.१५
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	१,४२१.५४	६२०.१४	९२९.२०	२,०४१.६८	१,२६९.३६	२,७८०.४०
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	–	–	–	–	–	(१८,७५०.८४)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)*						
मूलभूत (₹)	०.५९	०.२६	०.३९	०.८५	०.५३	१.१६
सौमिकृत (₹)	०.५९	०.२६	०.३९	०.८५	०.५३	१.१६

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

सूचना:

१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ **www.mcxccl.com** वर उपलब्ध आहे.
२. दिनांक २७ ऑक्टोबर २०२० रोजी झालेल्या लेखापरीक्षा समितीच्या सभेत वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन केले गेले आहे आणि दिनांक २८ ऑक्टोबर २०२० रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ: मुंबई | दिनांक: २८ ऑक्टोबर २०२०